पुढारी

4 MAY 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अपयशाबरोबर यशाचे विश्लेषण महत्त्वाचे

## कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे; जत येथे शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीचे वाटप

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

अपयशाचे विश्लेषण करणे हे ठीकच आहे; पण यशाचेही विश्लेषण करण्याची सवय लावल्यास प्रगतीकडे वाटचाल करता येते, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

जत येथील राजे रामराव महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती पुरस्कार वितरण समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. अभयकुमार साळुंखे होते. याप्रसंगी बीसीयूडी संचालक प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी मनोगत व्यक्त केली. पुरस्कारप्राप्त महाविद्यालयांच्या वतीने प्राचार्य डॉ. हिंदुराव पाटील, प्राचार्य डॉ. विक्रम पाटील, प्राचार्य डॉ. प्रकाश हेरेकर यांनी प्रातिनिधिक मनोगत व्यक्त केली. यावेळी राजे रामराव महाविद्यालयाच्या 'राम-विजय' या वार्षिक अंकाचे प्रकाशन करण्यात आले. प्राचार्य डॉ. एस.वाय. होनगेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.



**कोल्हापूर : विज्ञान शाखेतून ग्रामीण भागासाठीचा शिष्यवृत्ती गुणवत्ता पुरस्कार कुलगुरू डॉ.देवानंद शिंदे यांच्या हस्ते स्वीकारताना राजे रामराव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर.**

कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते २०१५-१६च्या शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीसाठी शहरी, निमशहरी व ग्रामीण महाविद्यालये या गटांतून विद्याशाखानिहाय गुणानुक्रमे प्रथम आलेल्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांना पुरस्कार वितरण करण्यात आले. ते पुढीलप्रमाणे...

**कला विद्याशाखा–** न्यू कॉलेज, कोल्हापूर (प्राचार्य डॉ. एन.व्ही. नलवडे), शिवराज कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स अँड डी.एस. कदम सायन्स कॉलेज, गडहिंग्लज (प्राचार्य डॉ. एस.आर. कोतमिरे), श्रीपतराव चौगुले आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज, माळवाडी-कोतोली, ता. पन्हाळा (प्राचार्य डॉ. महाजन). **वाणिज्य विद्याशाखा–** विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर (प्राचार्य डॉ. हिंदुराव पाटील), श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी (डॉ. बी.ए. खोत), देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल (प्राचार्य डॉ. प्रकाश हेरेकर). **विज्ञान विद्याशाखा–** यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा (प्राचार्य डॉ. के. जी. कानडे), डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज (प्राचार्य डॉ. एम.आर. पाटील), राजे रामराव महाविद्यालय, जत (प्राचार्य डॉ. एस.वाय. होनगेकर). **अभियांत्रिकी विद्याशाखा–** कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारा (प्राचार्य डॉ. विक्रम पाटील), डीकेटीई टेक्स्टाईल अँड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट, सांगली (प्राचार्य डॉ. पी.व्ही. कडोले), कोल्हापूर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, कोल्हापूर (प्राचार्य डॉ. व्ही.व्ही. कार्जिनी). **शिक्षणशास्त्र विद्याशाखा–** महावीर महाविद्यालय, कोल्हापूर (प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे), कर्मवीर हिरे आर्टस्, कॉमर्स, सायन्स अँड एज्युकेशन महाविद्यालय, गारगोटी (प्राचार्य डॉ. आर.एस. कांबळे). **विधी विद्याशाखा–** शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर (प्राचार्य डॉ. आर. नारायणा).

तरुण भारत

4 MAY 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यशाच्या विश्लेषणातून प्रगतीकडे वाटचाल

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन:जत येथे राजे महाविद्यालयात पुरस्कारांचे वितरण

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

अपयशाचे विश्लेषण करणे कठीण आहे, पण यशाचेही विश्लेषण करण्याची सवय लावल्यास खऱ्या अर्थाने प्रगतीकडे वाटचाल करता येते, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

जत (जिल्हा सांगली) येथील राजे रामराव महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती पुरस्कार वितरण करण्यात आले. यप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अभयकुमार साळुंखे होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, यश हे सावलीसारखे आहे. कष्ट केले की यश आपोआप मिळते. तुम्ही यशाच्या मागे धावलात तर मात्र तुमची दमछाक होते. प्रकाशाच्या दिशेने नेहमी चालत राहा.



कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे

यश आणि विवेक यांचा थेट संबंध असल्याने विवेक कधीही सोडू नका, असे आवाहनही कुलगुरू डॉ. शिंदे यांनी केले. अध्यक्षस्थानावरून अभयकुमार साळुंखे म्हणाले, समाज सुसंस्कृत व सुजाण करण्याच्या भावनेने कार्यरत राहाणे खूप महत्वाचे असते. विद्यापीठातर्फे चारा व धान्य वाटप हा उपक्रम त्याचेच द्योतक आहे. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधीलकी विकसित करण्याची जबाबदारी शिक्षकांची आहे.

२०१५-१६ गुणवत्ता शिष्यवृत्तीसाठी शहरी, निमशहरी व ग्रामीण महाविद्यालये या गटातून शाखानिहाय गुणानुक्रमे प्रथम आलेल्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांना पुरस्कार वितरण करण्यात आले. हे पुरस्कार विजेते विद्याशाखानिहाय आणि अनुक्रमे शहरी, निमशहरी व ग्रामीण या क्रमाने. कला विद्याशाखा- न्यू कॉलेज कोल्हापूर, शिवराज कॉलेज ऑफ आर्टस अॅण्ड कॉमर्स अॅन्ड डी. एस. कदम सायन्स कॉलेज गडहिंग्लज, श्रीपतराव चौगुले आर्टस अॅन्ड कॉमर्स कॉलेज माळवाडी-कोतोली (ता. पन्हाळा). वाणिज्य विद्याशाखा विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर, श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी, देवचंद कॉलेज, अर्जुननगर कागल. विज्ञान विद्याशाखा यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्युट ऑफ सायन्स (सातारा), डॉ. घाळी कॉलेज गडहिंग्ज, राजे रामराव महाविद्यालय (जत). अभियांत्रिकी विद्याशाखा कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (सातारा), डीकेटीईज् टेक्स्टाईल अॅन्ड इंजिनिअरिंग इन्स्टिट्युट (सांगली), कोल्हापूर इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी (कोल्हापूर). शिक्षणशास्त्र विद्याशाखा महावीर महाविद्यालय (कोल्हापूर), कर्मवीर हिरे आर्टस् कॉमर्स, सायन्स अॅन्ड एज्युकेशन महाविद्यालय (गारगोटी). विधी विद्याशाखा शहाजी लॉ कॉलेज (कोल्हापूर).

यावेळी बीसीयुडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्राचार्य डॉ. हिंदुराव पाटील, प्राचार्य डॉ. विक्रम पाटील, प्राचार्य डॉ. प्रकश हेरेकर आदी उपस्थित होते.

सकाळ

4 MAY 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यशाच्या विश्लेषणातून प्रगतीकडे वाटचाल

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती पुरस्कारांचे वितरण

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३ : अपयशाचे विश्लेषण करणे ठीकच आहे; पण यशाचेही विश्लेषण करण्याची सवय लावल्यास खऱ्या अर्थाने प्रगतीकडे वाटचाल करता येते, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. जत येथील राजे रामराव महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती पुरस्कार वितरण समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. अभयकुमार साळुंखे होते.

श्री. साळुंखे म्हणाले, "समाज सुसंस्कृत व सुजाण करण्याच्या सकारात्मक भावनेतून कार्यरत राहणे खूप महत्त्वाचे आहे. सामाजिक दायित्वाची भावना त्यातूनच प्रबळ होत असते. शिवाजी विद्यापीठाचा चारा व धान्य वाटपाचा उपक्रम हे त्याचेच द्योतक आहे. अशी बांधिलकी विद्यार्थ्यांत विकसित करण्याची जबाबदारी शिक्षकांसह प्रत्येक जबाबदार घटकावर आहे."

बीसीयूडी संचालक प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्राचार्य डॉ. हिंदुराव पाटील, प्राचार्य डॉ. विक्रम पाटील, प्राचार्य डॉ. प्रकाश हेरेकर यांनी मनोगत व्यक्त केले. राजे रामराव महाविद्यालयाच्या 'राम-विजय' या वार्षिकांकाचे प्रकाशन झाले.



प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी प्रास्ताविक केले. कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते २०१५-१६च्या शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीसाठी शहरी, निमशहरी व ग्रामीण महाविद्यालये या गटांतून विद्याशाखानिहाय गुणानुक्रमे प्रथम आलेल्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांना पुरस्कार वितरण झाले.

विद्याशाखानिहाय शहरी, निमशहरी व ग्रामीण पुरस्कार विजेते अनुक्रमे असे (कंसात प्राचार्य) -

कला विद्याशाखा- न्यू कॉलेज, कोल्हापूर (प्राचार्य डॉ. एन .व्ही. नलवडे), शिवराज कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स, डी. एस. कदम सायन्स कॉलेज, गडहिंग्लज (प्राचार्य डॉ. एस. आर. कोतमिरे), श्रीपतराव चौगुले आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज, माळवाडी-कोतोली, ता. पन्हाळा (प्राचार्य डॉ. महाजन). वाणिज्य विद्याशाखा- विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर (प्राचार्य डॉ. हिंदूराव पाटील), व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी (डॉ. बी. ए. खोत), देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल (प्राचार्य डॉ. प्रकाश हेरेकर).

विज्ञान विद्याशाखा- यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, सातारा (प्राचार्य डॉ. के. जी. कानडे), डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज (प्राचार्य डॉ. एम. आर. पाटील), राजे रामराव महाविद्यालय, जत (प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर).

अभियांत्रिकी विद्याशाखा- कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारा (प्राचार्य डॉ. विक्रम पाटील), डीकेटीईज् टेक्स्टाइल अँड इंजिनिअरिंग इन्स्टिटयूट, सांगली (प्राचार्य डॉ. पी. व्ही. कडोले), कोल्हापूर इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी (प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. कार्जिनी). शिक्षणशास्त्र विद्याशाखा- महावीर महाविद्यालय, कोल्हापूर (प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे), कर्मवीर हिरे आर्टस्, कॉमर्स, सायन्स अँड एज्युकेशन महाविद्यालय, गारगोटी (प्राचार्य डॉ. आर. एस. कांबळे). विधी विद्याशाखा- शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर (प्राचार्य डॉ. आर. नारायणा).

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत 4 MAY 2016

# शेख, लठ्ठेंची 'नोबेल लॉरेट'साठी निवड

## जर्मनीत परिषद : देशातील २१ जणांचा सहभाग

कोल्हापूर : पदार्थविज्ञान



जस्मीन शेख



संजय लठ्ठे

विषयाबाबत जर्मनीमध्ये दि. २६ जून ते १ जुलै २०१६ दरम्यान होणाऱ्या ६६व्या लिंडेऊ नोबेल लॉरेट परिषदेसाठी शिवाजी विद्यापीठातील डॉ. जस्मीन शमशुद्दीन शेख आणि डॉ. संजय सुभाष लठ्ठे यांची निवड झाली आहे. कौन्सिल फॉर दि नोबेल लॉरेट मिटींग या संस्थेकडून त्यांना निवडीचे पत्र प्राप्त झाले आहे.

या परिषदेसाठी निवड झालेल्या डॉ. शेख या विद्यापीठात संशोधक म्हणून कार्यरत आहेत. डॉ. लठ्ठे हे सध्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात संशोधन करीत आहेत. त्यांना या निवडीसाठी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, पदार्थविज्ञान विभागप्रमुख डॉ. सी. डी. लोखंडे, प्रा. पी. एस. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. दरम्यान, मूळ वाखरी (ता. पंढरपूर) येथील असलेल्या डॉ. शेख यांचे वडील शमशुद्दीन हे निवृत्त कृषी सहायक अधिकारी आहेत. रसबावी व पंढरपूर येथे त्यांनी प्राथमिक, माध्यमिक शिक्षण घेतले. शिवाजी विद्यापीठात एम. एससी. व पीएच.डी. पदवी त्यांनी मिळविली. त्यानंतर सन २०११मध्ये त्यांनी दक्षिण कोरियातील हॅनयांग विद्यापीठात संशोधन केले. त्यांचे १८ शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. सौरघट व सुपर-कपॅसिटर हे त्यांच्या संशोधनाचे विषय आहेत.

प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण घेतलेल्या डॉ. लठ्ठे यांची गेल्यावर्षी 'इन्स्पायर फॅकल्टी अॅवॉर्ड'साठी निवड झाली. मूळचे सांगोला (जि. सोलापूर) येथील असलेल्या डॉ. लठ्ठे यांनी 'कमवा व शिका'या योजनेअंतर्गत एम.एससी. विषयातील पदवी मिळविली. पीएच.डी.मधील संशोधनाच्या आधारे त्यांची इस्तंबूल येथील कोच विद्यापीठात पोस्ट-डॉक्टरेटसाठी निवड झाली. त्यानंतर सेऊल येथील कोरिया विद्यापीठात हायड्रोजन वायू निर्मिती, पाण्यात मिसळलेल्या विषारी घटकांना वेगळे करण्यासाठी मेम्ब्रेन निर्मितीच्या संशोधनासाठी निवड झाली. त्यांना 'जपान सोसायटी फॉर द प्रमोशन ऑफ सायन्स'ची शिष्यवृत्तीही मिळाली. टोकियो युनिव्हर्सिटी ऑफ सायन्सचे कुलगुरु प्रा. अकिरा फुजिशिमा यांच्यासोबत काम करण्याची संधी त्यांना मिळाली. त्यांचे ४४ आंतरराष्ट्रीय शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. (प्रतिनिधी)

### पदार्थविज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन

या लॉरेट परिषदेमध्ये पदार्थविज्ञान विषयातील नोबेल पुरस्कार विजेते तरुण संशोधकांना मार्गदर्शन करतात. या शास्त्रज्ञांसमोर पोस्टर, मौखिक सादरीकरणाची संधी त्यांना मिळते. परिषदेसाठी जगभरातील सुमारे चारशे तरुण संशोधकांची निवड केली जाते. यंदा या परिषदेसाठी भारतातून २१ संशोधकांची निवड केली आहे. यात डॉ. शेख, लठ्ठे यांचा समावेश आहे, हे अभिमानास्पद असल्याचे कुलगुरु डॉ. शिंदे यांनी सांगितले.





पुढारी

4 MAY 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नोबेल लॉरेट परिषदेसाठी दोघांची निवड





डॉ. जस्मीन शेख डॉ.संजय लट्ठे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जर्मनीत २६ जून ते १ जुलै २०१६ या कालावधीत होणाऱ्या प्रतिष्ठेच्या ६६ व्या लिंडेऊ नोबेल लॉरेट परिषदेसाठी शिवाजी विद्यापीठाचे दोन तरुण संशोधक डॉ. जस्मीन शमशुद्दीन शेख, डॉ. संजय सुभाष लट्ठे यांची निवड झाली आहे. कौन्सिल फॉर दि नोबेल लॉरेट मिटिंग या संस्थेकडून नुकतेच त्यांच्या निवडीचे पत्र प्राप्त झाले आहे.

डॉ. जस्मीन शेख या सध्या पदार्थविज्ञान अधिविभागात प्रा. पी.एस. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महिला संशोधक पदावर कार्यरत आहेत. विद्यापीठात एम.एस्सी. व पीएच.डी. पदवी त्यांनी मिळविली. २०११ मध्ये त्यांना दक्षिण कोरियातील हॅनयांग विद्यापीठात एक वर्ष संशोधन करण्याची संधी मिळाली. २०१५पासून शिवाजी विद्यापीठात 'डीएसटी'अंतर्गत महिला संशोधक पदावर त्या कार्यरत आहेत. डॉ. शेख यांचे १८ शोधनिबंध प्रकाशित झाले



शिवाजी विद्यापीठातून

आहेत. विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांत त्यांना पुरस्कार मिळाले आहे. नॅनो-मटेरियलसंदर्भात त्यांचे एक पुस्तकही प्रकाशित आहे.

डॉ. संजय लट्ठे यांची आठवडा बाजार, किराणा मालाचे दुकान आणि अगदी मंगल कार्यालयात वाढप्याचेही काम करत भारत सरकारच्या डिपार्टमेंट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी (डीएसटी) तर्फे 'इन्स्पायर फॅकल्टी ॲवॉर्ड' साठी निवड झाली. मूळचे सांगोला (जि. सोलापूर) येथील असलेल्या संजय यांनी पदव्युत्तर शिक्षणासाठी शिवाजी विद्यापीठाच्या 'डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन'मध्ये त्यांना 'कमवा व शिका' योजनेअंतर्गत प्रवेश मिळाला. एम.एस्सी. (पदार्थविज्ञान) विषयात त्यांनी प्रथम श्रेणी मिळविली.

पीएच.डी.साठी प्रवेश मिळवून पाण्याला अवरोध करणारे कोटिंग तयार करण्याचे संशोधन त्यांनी प्रा. ए.व्ही. राव यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले. जपान सरकार पुरस्कृत 'जपान सोसायटी फॉर द प्रमोशन ऑफ सायन्स' ची प्रतिष्ठेची शिष्यवृत्तीही त्यांना मिळाली. डॉ. लट्ठे यांचे ४४ आंतरराष्ट्रीय शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. विविध राष्ट्रीय आणि आंतराष्ट्रीय सेमिनारमध्ये त्यांनी १५ शोधनिबंध सादर केले आहेत.